SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५

अधिसूचना

क्रमांक : २०१/२०२५ दिनांक : २८.१०.२०२५

विषय : सन २०२४-२०२५ चे डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्रदान करणेबाबत.

संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक - पुरस्कार-२०२५/CN-१३१०६४२/प्र.क्र. ८९/ समन्वय, दि. ०५ सप्टेंबर, २०२५

२) शासन परिपत्रक क्रमांक - पुरस्कार-२०२५/CN-१३१०६४२/प्र.क्र. ८९/समन्वय, दि. १६/१०/२०२५

३) क्रमांक उशिस-२०२५-शिक्षक पुरस्कार/प्रशा-३/ई-२००२२८६, दि. १७/१०/२०२५

ज्याअर्थी उपरोक्त विषयांस अनुसरून शासनाने संदर्भांकित आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराचे नांव बदलवून सदर पुरस्काराचे नाव डॉ. जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार असे संबोधित केलेले आहे व दि. २६ डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णयातील कार्यपध्दतीमध्ये सुधारणा केली आहे.

आणि

ज्याअर्थी निर्देशित कालावधी सन २०२४-२०२५ या वर्षाकरिता प्रक्रिया राबवावयाची आहे आणि यासाठी जाहिरात तातडीने प्रसिध्द करावयाची आहे व सदर पुरस्कार यापुढे नियमित प्रमाणे वितरीत होणार आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना व इच्छुक असलेल्या सर्व संबंधितांना अधिसूचित करण्यात येत आहे. आणि त्यांनी विद्यापीठाची या संबंधात जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर व त्यामधून दर्शविलेली अंतिम तारखेच्या आत उपरोक्त नमूद शासन निर्णय व परिपत्रकातील अटी व शर्तीची पूर्तता करून आपले अर्ज ४ प्रतींमध्ये Spiral Binding स्वरूपात विद्यापीठाला सादर करावे.

संदर्भांकित क्रमांक १,२ व ३ ची प्रत विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

आदेशान्वये

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ